# अधिसूचना - १९

उपविभागीय अधिकारी, राधानगरी-कागल
उपविभाग कोल्हापूर यांचे कार्यालय
दिनांक - ~~/०५/२०१९~~
20/06/2018

क्रमांक : **एस.आर.क्रमांक २२८/२०१८** ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या **कोल्हापूर** जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोट कलम (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना, क्रमांक ११ राजपत्र २० ते २६ सप्टेंबर २०१८ अन्वये पान क्र. १३ ते १५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्यामध्ये दुरुस्ती अधिसुचना १६ ते २२ मे २०१९ पान नं. ४ अन्वये काढणेत आली आहे. त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे. तसेच ज्याअर्थी जिल्हाधिकारी ,कोल्हापूर यांनी दि. ०३/०९/२०१८ रोजी कलम ११ च्या अधिसुचनेस मान्यता प्रदान केलेली आहे. व कलम ११ च्या दुरुस्ती अधिसुचनेस दि. ६/०५/२०१९ रोजी जिल्हाधिकारी ,कोल्हापूर यांनी मान्यता प्रदान केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी राधानगरी-कागल उपविभाग कोल्हापूर यांचेकडे कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये कोणत्याही खातेदारांने आक्षेप नोंदविलेला नाही. उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे, आणि म्हणून, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपविभागीय अधिकारी राधानगरी-कागल उपविभाग जि.कोल्हापूर** यास (अधिसूचना काढण्यापूर्वी अधिकाऱ्यांचे नाव व पत्ता नमूद करावा) पदनिर्देशित करीत आहे.

Scanned by CamScanner

**अनुसूचि - एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**गावाचे नांव - व्हन्नूर, तालुका-कागल , जिल्हा-कोल्हापूर**

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) | दिशा |
|---|---|---|---|
| १ | ५२८ | ४.०६<br>पो.ख. ०.३१ | ---- |
| २ | ९०१ | २.४४<br>पो.ख. ०.०९ | ---- |
| ३ | ९८३ | ०.१८<br>पो.ख. ०.०१ | ---- |
| ४ | १११३ | ०.२१ | ---- |
| ५ | ९७७ पै. | ०.४१ | पुर्वेकडून पश्चिमेकडे |
| | **एकूण** | **०७.३०**<br>पो.ख. ०.४१ | |

**अनुसूची -दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नांव -** दुधगंगा मोठा पाटबंधारे प्रकल्प ,कोल्हापूर

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन -**

दूधगंगा प्रकल्प हा महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील आंतरराज्यीय प्रकल्प आहे. या प्रकल्पातंर्गत दूधगंगा नदीवर आसनगांव ता. राधानगरी जि.कोल्हापूर येथे १२८० मी. लांबीचे (मध्यभागी नदीपात्रात दगडी व दोन्ही तीरावर मातीचे असे संयुक्त)धरण आहे. दूधगंगा धरणाखालील दोन्ही तीरावर कालवे असून,सदर कालव्याची लांबी उजवा तीर कालवा २४ किमी व उजवा तीर कालव्याखालील बिद्री शाखा कालवा ४१ कि.मी .,निढोरी शाखा कालवा २५ कि.मी,कूर शाखा कालवा १७ कि.मी.,डावा तीर कालवा ७६ कि.मी., डाव्या तीर कालव्याखालील कोल्हापूर शाखा कालवा ३८ कि.मी. व कुरुंदवाड शाखा कालवा ४० कि मी. इतकी आहे.

Scanned by CamScanner

सदर धरणामध्ये ७१९.१२ दलघमी इतका पाणीसाठा होत असून त्यामुळे महाराष्ट्र राज्यातील ६१०३२ हे.(पीक क्षेत्र) व कर्नाटक राज्यातील १२९८५ हे.(पीकक्षेत्र) क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. सदर प्रकल्पास तृतीय प्रशासकीय मान्यता रु. १७१२७९.९० लक्ष दिनांक १५/७/२०११ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. आतापर्यंत सदर प्रकल्पावर रु. ९९६६३ लक्ष इतका खर्च झालेला आहे. सदर प्रकल्पाची उर्वरित किंमत रु. ७१६१६.९० लक्ष इतकी आहे. त्यामुळे सध्यस्थितीत सदर प्रकल्पास अनुदान उपलब्ध आहे.

**समाजाला होणारे लाभ -**

**अ)** या प्रकल्पामुळे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये बारमाही पाण्याची सोय झाल्यामुळे नगदी पिके घेणे शक्य होऊन लोकांचा आर्थिक व सामाजिक स्तर विकसित झाला असून लाभ क्षेत्रातील पाणी टंचाई दूर झालेली आहे.

**ब)** प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील पीक क्षेत्रामध्ये वाढ झाली असून, त्यामुळे स्थानिक लोकांना रोजगार मिळाला आहे.

**क)** पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध झाल्यामुळे विविध प्रकारची नगदी पिके घेणे शक्य होवून लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांचे आर्थिक राहणीमान सुधारल्यामुळे ते लोक सर्व नागरी सुविधा मिळविण्याबाबत सक्षम झालेले आहेत.

**ड)** प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रामध्ये उसासारखी नगदी पिके घेतल्यामुळे साखर कारखान्यासारख्या औद्योगिक क्षेत्रामध्ये वाढ होवून विकास झालेला आहे.

## अनुसूची -तीन

### बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

मौ. व्हन्नूर ता.कागल येथील जमीन दूधगंगा प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी संपादन करावयाच्या सदर क्षेत्रामध्ये फक्त शेतजमीन येत असून ,गावठाणे विस्थापित होत नाहीत. सबब विस्थापितांचे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही.

## अनुसूची-चार

**(सामाजीक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजीक प्रभाव निर्धारणाचा सारांश,**

दुधगंगा हा महाराष्ट्र व कर्नाटक अंतरराज्य प्रकल्प आहे. सदर प्रकल्पाचा नियत दिनांक दि.२.११.१९७८ हा आहे.दुधगंगा अंतरराज्य प्रकल्पास भारत सरकारच्या पर्यावरण व वन मंत्रालय यांचे पत्र क्र. G- २२१/९२FC दिनांक १६/११/१९९४अन्वये तसेच मा. भारत सरकारच्या पर्यावरण व वनखात्याची त्यांचे पत्र क्र. /Bo/Bo/Env -५ दि. २/१/१९८४ अन्वये पर्यावरण व वनखात्याची मान्यता प्राप्त झालेली आहे. तसेच सदर दोन्ही आदेशान्वये अतिरिक्त संचालक मा. भारत सरकार पर्यावरण एवं वन मंत्रालय यांनी त्यांचे पत्र क्र.१२००११/संकिर्ण/A-१ दि. ०७/०२/२००८ अनव्ये मा. भारत सरकारच्या

Scanned by CamScanner

दि. ०२/०१/१९८४ व १६/११/१९९४ च्या आदेशान्वये पर्यावरण व वनजमिनीस दिलेली मान्यताचे विषद करुन संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे. सदर प्रकल्पास मा. भारत सरकारच्या पर्यावरण व वन विभागाची मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर दुधगंगा प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना देय असलेल्या पर्यायी जमिन वाटपाची कार्यवाहीही पूर्ण झालेली आहे. तसेच सदर प्रकल्प ग्रामीण पायाभूत सुविधांतर्गत आहे. नवीन भूसंपादन अधिनियम २०१३ नुसार सदर प्रकल्पास सुधारीत S.I.A करण्याची आवश्यकता नाही.

**टिप :** उक्त जमिनीच्या नकाशाचे उपविभागीय कार्यालय , राधानगरी-कागलउपविभाग, कोल्हापूर या कार्यालयात निरीक्षण करता येईल.

20/08/2018
**दिनांक** :- ~~/०५/२०१९~~

ठिकाणः कोल्हापूर

(डॉ. ~~निगुण कुलकर्णी~~) 31/05/19

उपविभागीय अधिकारी

राधानगरी-कागल उपविभाग कोल्हापूर

उपविभागीय अधिकारी कागल-राधानगरी उपविभाग, कोल्हापूर

जिल्हाधिकारी कोल्हापूर

Scanned by CamScanner